Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-XII | Dec. | 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# देशातील काळा पैसा,भ्रष्टाचार आणि बनावट नोटांचा सूळसुळाट थांबविण्यासाठी सरकारने उचलेल्या धाडसी पावले

एफ.पी.साहाळा
सहा.प्रा.
नेहरू (कला,वाणिज्य आणि विज्ञान) महाविद्यालय,
नेर (पं)

केंद्र सरकारने अचानक घेतलेल्या नोटाबंदीच्या निर्णयाचा देशातील बहुतांशी लोकांनी स्वागत केले.म्हणजेच " देश बदल रहा है" या वाक्याला नजरेसमोर ठेऊन अनेकांनी पाठींबा दर्शविला आहे.नोटबंदीचा हा निर्णय ८ नोव्हे २०१६ म्हणजेच दिवाळी संपून एका आठवडयात झाला.निश्चलनीकरणाचे निर्णय घटनेनुसार दर दहा वर्षांनी व्हाववयास पाहिजे परंतु असे होत नाही तर असा धाडस मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी दाखविला आहे.मला असे म्हणायचे आहे की, विमुद्रीकरणासोबत मा.नरेंद्र मोदीजी यांनी आपल्या कार्यकाळ मध्ये आतापर्यंतच्या साहसीक,आर्थिक आणि सियासी निर्णय घेतला आहे.मला असे वाटते की देशाला बदलत्या प्रवाहामध्ये नेण्यासाठी अशे शॉक थेरेपी आवश्यक असतात भ्रष्टाचारचा विरुद्ध उचलेला हा एक पाउल भ्रष्टाचाराला काही प्रमाणात जळापर्यंत मिटवेल व स्वच्छ आणि सुंदर भारताचा नवीन बी रोवल्या जाईल यात काही शक नाही.नोटाबंदी आणि कॅशलेस च्या घेतलेल्या निर्णयामुळे अर्थव्यवस्था खासकर अनौपचारी अर्थव्यवस्थेच्या कामकाजावर खळबळ माजला आहे. कधीकधी अश्या कार्यवाहीसाठी अव्वल दर्जाच्या गोपनियता ठेवाव लागत असते. मला अस वाटत की,अचानकपने घेतलेला निर्णय हाच देशाच्या विकासात्मक दृष्टीकोनातून भविष्यकालीन फायद्याच ठरत असत.

भाजप सरकार सत्तेवर आल्यानंतर लगेचच देशाच्या अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाचे जळापासून उच्चाटन करण्याची मोहीम हाती घेतली आणि आय.डी.एस बहिसोबी उत्पन्न घोषणा योजनेबाबत सरकारने वेळोवेळी जनेतेला आव्हान केले. नरेंद्र मोदिजी यांनी जनेतेला अखेरच्या इशारा देतांना सांगितले होते की ३० सप्टे. नंतर सरकार कर चोरी करणाऱ्यांना कायदाचा कठोर कार्यवाही करण्यात येईल त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे दया याचना दाखवनार नाही. देशातील एकूण १२० कोटी लोकसंख्यापैकी ५.४३ कोटी जनता करदाते आहे परंतु यातले सर्वच लोक नियमित आपले उत्पन्न घोषित

करण्यात टाळाटाळ करीत असतात. त्यामुळे प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या लोकांवरच कराचे ओझे पडत असते. आर्थिक अहवाल व अंदाज पत्रकानुसार अर्थव्यवस्थेतील एकूण ७०% च्या जवळपास काळा पैसा भारतात आहे. नोव्हेंबर महिन्याच्या ८ तारखेला रात्री ८ वाजता राष्ट्रीय टेलीविजनवर घोषणा केली की मध्येरात्रीपासून ५०० आणि १००० रुपये किमतीच्या नोटा चलनात राहणार नाही परंतु नोटा बँकेत बदलविता व जमा करता येईल नोटा जमा करण्यात सरकार काही मर्यादाही घालून दिले.यानिर्णयाने एका झटक्यात " देश मे भ्रष्टाचार की जननी" म्हटले जाणारे चुनावी चंद्यावर मोठा घाव केला.याच कालावधीत अनेक ठिकाणी नगरपरिषदेच्या चुनाव सुद्धा होता.नोटबंदीच्या घोषणेने दिवसातील ७ हजार ७०० कोटीच्या नोटा बाद झाल्या देशभरातील मुद्रणालयाची वार्षिक मुद्रण क्षमता २,६०० कोटी नोटा आहे. बाद झालेल्या देशातील संपूर्ण नोटांचा रेप्लेसमेंटसाठी किमान १५ ते २० महिने लागतील. या निर्णयाच्या पहिल्यादिवसापासून एक महिना लोटला तरी सुद्धा बँकासमोरील रांगा आताही संपलेला नाही पैशाच्या चणचण सर्व देशाला भासत आहे. अनेका बँकामध्ये रांगा तर ज्याठिकानातील A.T.M मध्ये रक्कम आहेत त्याठिकाणी सुद्धा मध्यरात्रीपर्यंत रांगा आहे. चलनाच्या कमतरतेमुळे अनेक ठिकाणचे A.T.M बंद पडले आहे कारण त्या बँकामध्ये जितके पैसे येतात ते पुरेशे नाही प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजेपेक्षा कमीच पैसा बँकामधून मिळत आहे. सरकारच्या या धाडसी पावलाच्या सर्वात महत्वाचा फटका ग्रामीण भागाला बसू शकतो ग्रामीण भागातील बँक आणि A.T.M ची संख्या त्यात असणारी रक्कम बरीच कमी आहे. महाराष्ट्रातील काही वार्ताहारांनी घेतलेल्या आढाव्यानुसार असे दिसून आले की, विविध जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लघु व मध्यम उद्योगांना निश्चलनीकरणाच्या फारसा फटका बसलेला नाही परंतु नवीन चलन बाजारपेठेमध्ये आल्यानंतर लहान नोटांचा अभाव मात्र जाणवू लागला.सरकारने उचलेल्या या धाडसी पावलाचे पडसाद समजामध्ये हळूहळू दिसू लागले आहे उद्योगांना या निर्णयाने थोडा त्रास सहन करावा लागत असला तरी दीर्घकाळासाठी उद्योगांवर सकारात्मक परिणाम होणार असल्याच देशातील अनेक तज्ञांच मत आहे कोणत्याही कार्याच्या यशस्वीतेसाठी थोडा त्रास सहन करावाच लागतो.

२०१४ मध्ये काळ्या पैशाच्या समस्येबाबत सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री.एम.बी.शाह यांच्या अध्यक्षेतेखाली एका शोध समितीची स्थापना करण्यात आली होती.यासमितीने सादर केलेल्या अहवालानुसार अर्थव्यवस्थेतील कळ्या पैशाच्या गुंतवनुक थांबविण्यासाठी ३ लाख व त्यावरील मूल्याचा रोख अर्थीक व्यवहारांवर व व्यक्तीगत स्तरावर १५ लाख रुपये व त्यापेक्षा रोख रक्कम स्वतःजवळ निर्बंध आणायला

हवे होते असे बंधने घातले असते तर आपोआपच कोणतेही नोंद नसलेले आर्थिक व्यवहार कमी झाले असते.

**निश्चलनीकरणामुळे होणारे फायदे:--**

१) देशातील अनेक श्रीमंतव्यक्तींकडे असलेले काळा पैसा बाहेर निघतील.

२) कर चोरी होण्याचे प्रमाण कमी होतील. कर चोरी थांबविण्यासाठी सरकार आज उत्तम असे उपाय शोधून काढले आहेत म्हणजेच कॅशलेस व्यवहार होय.

३) कॅशलेस व्यवहार यशस्वी झाल्यास देशातील लहानात लहान उद्योगापासून तर मोठ्या उद्योगांचा तर सर्व दैनदिन होणाऱ्या व्यवहारांचे माहिती बँकामार्फत सरकारला मिळत राहतील म्हणजेच वर्षभरात व्यवसायीकांनी किती उत्पन्न कमविले आहे त्या सरकारला माहित असेल त्यामुळे कर चोरी होणार नाही.

४) नोटाबंदीच्या निर्णयाबरोबरच सरकारने सोन्यावर घातलेल्या मर्यादा देखील फायद्याचे ठरेल.कारण ज्यांच्याकडे काळा पैसे असेल ती व्यक्ती सोन्यामार्फत Black Money White करण्याचा प्रयत्न करणार नाही.

५) निश्चलनीकरणामुळे बनावट नोटा बंद झालेल्या आहे.

**निश्चलनीकरणामुळे देशात झालेले परिणाम :**

निश्चलनीकरणामुळे देशातील अनेक क्षेत्रावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत आहे एकूणच नोटबंदीमुळे फायदा कमी आणि नुकसान झाले आहे.

१) अर्थव्यवस्थेत कमीतकमी ३ लाख कोटीचे नुकसान होणार आहे ३० डिसे. नंतरही होतच राहणार आहे जर सरकार सक्षम कर प्रणाली निर्माण करून जानेतेचा विश्वास जिंकूनच काळा पैसा निर्माण होणे थांबविता येईल.

२) शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे व्यापारी वर्ग शेतकऱ्यांना अडचणीत टाकत आहे पावसाच्या हजेरीमुळे सुखावलेल्या शेतकरी आता निश्चलनीकरणाच्या गोंधळामुळे आर्थिक कुचंबनेत अडकला आहे या निर्णयामुळे शेतकऱ्यांवर वाईट दिवस आले आहे.

३) यानिर्णयामुळे रोजगारावर विपरीत परिणाम झाल्याचे विविध मिडीयानी दिलेल्या भेटीवरून स्पष्ट झाले आहे. आज छत्तीसगड, मध्य प्रदेश देशातील इतर सामान्य वर्ग मनरेगा या योजने अंतर्गत ज्यांना जॉबकार्ड मिळालेला आहे असे सर्व कामगार त्यांच्याजवळ काम नसल्यामुळे बेरोजगार झाले आहे.

४) फुटकळ व्यवसायात किमान ५०% घट झाले आहेत चाट,फ्रुट विकणारे व्यवसायीकाजवळ सुट्टे नाहीत तसेच ग्राहकाकडे सुद्धा नाहीत यामुळे फुटकळ व्यवसायात ५०% घट झाले आहेत.

५) नवीन नोकऱ्या वाढणार नाहीत उलट १५% रोजगार जाण्याचे शक्यता आहे.

६) परिवहन क्षेत्र तसेच फिल्म इंडस्ट्रीवर थोडाफार प्रमाणात का असेना फरक पडला आहे.

सरकार आता कॅशलेस सोसायटी निर्माण करण्यावर भर दिला आहे पण या धोरणामुळे मध्यम उद्योगपती भारत सोडून जिथे कर नाही अश्या ठिकाणी मलेशिया,सिंगापूर,पनामा,अरब राष्ट्रात स्थानांतरीत होतील कॅशलेस निर्माण करण्यासाठी राजकीय पक्ष,पुढारी व अधिकारी यांचा भ्रष्टाचार संपविण्याचा प्रयत्न करावा तेव्हा लोक कॅशलेस व्यवस्था स्वीकारतील.जेव्हा देशातील जनता तसेच लहान व्यवसायापासून तर मोठ्या व्यवसायापर्यंत व्यवसायीक कॅशलेस पेमेंटचे उपलब्ध सुविधा स्वीकारतील तेव्हाच सुट्टे पैशाचे समस्या सुटतील याप्रकारे सरकारने घेतलेल्या निर्णयाला सामन्य जनतेच्या सुद्धा सहकार्य लाभेल.

आज जगातील बलाढ्य देश काळ्या पैशाच्या समूळ उच्चाटनासाठी एकत्र येत आहे. सर्व शासकीय व खाजगी आर्थिक व्यवहारांची तसेच व्यवसाय संबंधी सर्व सविस्तर माहिती संबंधित राष्ट्राच्या सरकारी कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे.असे झाल्यास भविष्यात कर चुकवेगिरीला प्रतिबंध होईल आर्थिक घोटाळ्याचे प्रमाण कमी होईल .

संदर्भ :-

१) www.mhrd.gov.in/vikasa
२) विविध इंडिया टुडे
३) विविध योजना
४) लोकप्रभा ९ डिसे.
५) न्यूजपेपर दिव्य मराठी, सकाळ